# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. ३० एप्रिल २०१९**

# २१ अधिकारी-कर्मचारी मनपाच्या सेवेतून निवृत्त

**नागपूर,ता. ३० :** नागपूर महानगरपालिकेच्या सेवेत असलेले २१ अधिकारी-कर्मचारी मंगळवारी (ता. ३०) सेवानिवृत्त झाले. मनपाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने शाल, श्रीफळ, तुळशीचे रोप, स्मृतिचिन्ह आणि धनादेश देऊन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी निगम अधीक्षक मदन सुभेदार, सहायक अधिक्षक मनोज कर्णिक, दत्तात्रय डहाके, गौतम पाटील डोमाजी भडंग, जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर, सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस, अग्निशमन विभागाचे केशव कोठे, सुनील राऊत, बैस, शेषराव भगत, गिरीश उपासणी, उपस्थित होते.

सत्कारमूर्तींमध्ये कर अधीक्षक फागो उके, कनिष्ठ अभियंता ए.जे. शेगांवकर, सब ऑफिसर आर. एस. डकरे, उच्च श्रेणी लिपिक इजाज अहमद, मोहरीर प्रफुल्ल कांबळे, सहायक शिक्षक आर. एल. वंजारी, अण्णा

खंडार, प्रमोद वाघाडे, श्रीमिती यामिनी लुटे, श्रीमती रजनी मेश्राम, चपराशी विलास कागदेलवार, श्रीमती कुमुदिनी हाडके, पांडुरंग गावंडे, सफाई कामगार श्रीमती विमला रक्सेल, मुकेश लाहोरिया, खेमचंद खैरवा, श्रीमती पोर्णिमा नहारकर, डुमदेव नारनवरे, गँगमन राजेंद्र कावळे, हेल्पर गुलाब शेंडे, सफाई कामगार श्रीमती सुमन चुटेलकर यांचा समावेश होता. यावेळी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे संचालन जनसंपर्क अधिकारी अशोक कोल्हटकर यांनी केले तर आभार सहायक जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस यांनी मानले.